# जिल्हा निवड समिती गोंदिया
## शिक्षक भरती जाहिरात
## अनुसूचित जमाती उमेदवारां करीता विशेष भरती मोहीम 2019
## संस्थेचे नांव :- शिक्षण विभाग (प्राथमिक) जिल्हा परिषद, गोंदिया

जिल्हा परिषद गोंदिया येथील अनुसूचित जमाती करीता राखीव असलेले गट-क मधील सरळ सेवेतील रिक्त पदे भरण्यास विशेष भरती मोहिम 2019 अंतर्गत खालील रिक्त पदे सरळसेवेने भरण्यासाठी पात्रता धारण करीत असलेल्या अनुसूचित जमातीच्या पात्र उमेदवाराकडून अर्ज मागविण्यात येत आहेत.

भरती प्रक्रियेतील सविस्तर जाहिरात www.gondia.gov.in व www.zpgondia.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

**शैक्षणिक व व्यावसायीक पात्रता, विषय व पद निहाय पदांचा तपशिल**

| अ. क्र. | पद | वेतन श्रेणी / मानधन | विषय | शिकविण्याचे माध्यम | आवश्यक शैक्षणिक अर्हता व व्यावसायीक पात्रता |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |
| 1 | शिक्षण सेवक माध्यमिक (वर्ग 9 ते 10) | एकत्रित मासीक मानधन 3 वर्षा करिता रुपये 9000/- प्रति महिना | कला | मराठी | 1) मान्यता प्राप्त विद्यापीठाची संबंधित विषयांतील पदवी किंवा सामान्य पदवी परिक्षा अंतिम वर्षात संबंधित विषयासह किमान 50% गुणासह उत्तीर्ण आणि राष्ट्रीय अध्यापक शिक्षण परिषद मान्यता प्राप्त संस्थेतून शिक्षण शास्त्र पदवी (B.Ed) परिक्षा उत्तीर्ण किंवा राष्ट्रीय अध्यापक शिक्षण परिषद मान्यता प्राप्त संस्थेतुन 4 वर्षाची संबंधित विषयांतील पदवी परीक्षा B.A.Ed. किंवा समकक्ष संबंधित विषयातून किमान 50% टक्के गुणासह उत्तीर्ण असावा. |

**समांतर आरक्षण निहाय रिक्त पदांचा तपशिल**

टिप :- **भरती प्रक्रिये मधील रिक्त पद संख्ये मध्ये एकूण वाढ किंवा घट करण्याचे अधिकार तसेच भरती प्रक्रिया स्थगित करणे किंवा रदद करणे, परिक्षेचा प्रकार, संमातर आरक्षणात अंशत: बदल करणे तसेच भरती प्रक्रियेतील वाद / तक्रारी बाबद अंतिम निर्णय घेण्याचा अधिकारी जिल्हा निवड समिती गोंदिया यांना राहील.**

**सर्व साधारण सुचना :-**

1) केवळ जात वैधता प्रमाणपत्र धारण करणारे उमेदवारच नियुक्तीस पात्र राहतील.

2) वरिल पदाकरिता इच्छुक व अर्हता धारण करणारे उमेदवार यांनी जाहितरातीच्या अनुषंगाने जिल्हा निवड समिती कडे (शिक्षण विभाग प्राथमिक) जिल्हा परिषद गोंदिया यांचे कडे दिनांक 06 जानेवारी, 2020 सांयकाळी 5:45 वाजे पर्यंत अर्ज सादर करावे.

3) वरिल पदासाठी अभियोग्यता व बुध्दीमत्ता चाचणी (TAIT) परिक्षे पूर्वी TET(शिक्षक पात्रता परिक्षा उत्तीर्ण असणे अनिवार्य आहे.

4) वरिल शिक्षण सेवकांची भरती अभियोग्यता व बुध्दीमत्ता चाचणी (TAIT) या मध्ये मिळालेल्या गुणाच्या आधारावर करण्यात येईल.

5) उमेदवारा करिता वयोमर्यादा ही शासनाने वेळोवेळी विहित केल्याप्रमाणे राहील.

6) अर्जाची छाननी केल्यानंतर पात्र व परिपूर्ण कागदपत्रे सादर केलेल्या उमेदवारांचीच निवड करण्यात येईल.

7) उमेदवारानी विहित नमुन्यातच अर्ज सादर करावे. विहित नमुना जिल्हा परिषद गोंदिया यांचे www.gondia.gov.in व www.zpgondia . gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

8) अर्ज स्विकारण्याच्या दिवशी संध्याकाळी 5:45 वाजे पर्यंत प्राप्त झालेले अर्ज फक्त विचारात घेतले जातील. त्यानंतर आलेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत. पोष्टाने / कुरीअर व अन्य यंत्रणेद्वारे पाठविलेले अर्ज विलंबाने प्राप्त झाल्यास या कार्यालयाची जबाबदारी राहणार नाही.

स्वा/-
(राजकुमार हिवारे)
सदस्य
जिल्हा निवड समिती तथा
शिक्षणाधिकारी (प्राथ)
जिल्हा परिषद, गोंदिया

स्वा/-
(एस.ई.ए.हाश्मी)
सदस्य सचिव
जिल्हा निवड समिती तथा
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद,गोंदिया

स्वा/-
(एस.ई.ए.हाश्मी)
अध्यक्ष
जिल्हा निवड समिती
तथा जिल्हाधिकारी,गोंदिया

**वरील सर्व पदांसाठी आवश्यक सामाईक अर्हता खालील प्रमाणे असेल.**

| अ.क्र. | सामाईक अर्हता | तपशिल | |
|---|---|---|---|
| 1) | संगणक अर्हता :- | सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांक प्रशिक्षण 2000/प्र.क्र. 61/2001/39 दिनांक 19.03.2003 मधील तरतुदी नुसार (अ) D.O.E.A.C.C. सोसायटी च्या CCC किंवा O स्तर किंवा B किंवा C स्तर पैकी कोणतीही एक परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र किंवा महाराष्ट्र उच्च व तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई यांचे कडील अधिकृत MS-CIT परिक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र या पैकी एक प्रमाणपत्र किंवा माहिती तंज्ञज्ञान (साप्रवि) विभागाचा शासन निर्णय क्रमांक मातंस 2015/प्र.क्र.277/39 दिनांक 04.02.2013 व शासन पुरक पत्र क्र. मातंस 2012/प्र.क्र. 270/39/ दिनांक 08.01.2018 मध्ये नमुद केल्यानुसार आवश्यक संगणक अर्हता विहित मुदतीत प्राप्त करणे बंधनकारक आहे. | |
| 2) | लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र | महारष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र) नियम 2005 मधील तरतुदीनुसार शासकीय सेवेतील भरतीमध्ये विहीत नमुन्यातील प्रतिज्ञापत्र नियुक्ती वेळेस हजर होतांना विवाहीत उमेदवारांनी सादर करणे बंधनकारक राहील.<br>प्रतिज्ञापत्रात नमूद केल्यानुसार हयात असलेल्या अपत्यांची संख्या दोन पेक्षा अधिक असेल तर दिनांक 28 मार्च 2005 व तद्नंतर जन्माला आलेल्या अपत्यामुळे उमेदवार शासकीय सेवेच्या नियुक्तीसाठी अनर्ह ठरविण्यास पात्र होईल. | |
| 3) | निवड सुची व तीची कालमर्यादा | निवड समितीने तयार केलेली निवडसूची 1 वर्षासाठी किंवा निवडसूची तयार करतांना ज्या दिनांकापर्यंतची रिक्त पदे विचारात घेण्यात आली आहेत त्या दिनांकापर्यंत, यापैकी जे नंतर घडेल त्या दिनांकापर्यंत विधीग्राहय राहील. त्यानंतर ही निवडसूची व्यपगत होईल. | |
| 4) | समान गुण असल्यास अनुसरावयाची कार्यपध्दती | साप्रवि शासन निर्णय क्र. प्रानिमं 1216/प्र.क्र.65/16)/13-अ दिनांक 13 जून,2018 शासन पूरकपत्र क्रमांक प्रानिमं-1217/प्र.क्र.92/17)/13 -अ दिनांक 02 डिसेंबर, 2017 अन्वये परिक्षेचा निकाल तयार करतांना परिक्षेत ज्या पात्र यउमेदवारांना समान गुण अतील अशा असतील अशा उमेदवारांचा गुणवत्ता यादीमधील प्राधान्यक्रम पुढील प्रमाणे निश्चित करण्यात येईल. | |
| | | **अ) आत्महत्याग्रस्त** शेतक-याच्या पाल्यास प्रथम प्राधान्य राहील. | |
| | | **ब)** वयाने ज्येष्ठ असलेल्या उमेदवारास प्राधान्य देण्यात येईल. | |
| | | **क)** समान वय असलेल्या उमेदवारांच्या बाबतीत. अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकास उच्चतम शैक्षणीक अर्हता (पदयुत्तर पदवीधर. पदवीधर. उच्च माध्यमिक शालांत परिक्षा उत्तीर्ण. माध्यमिक शालांत परीक्षा उत्तीर्ण अशा प्रकारे धारण करणाऱ्या उमेदवारास प्राधान्यक्रम देण्यात येईल) | |
| | | **ड)** वरील प्रमाणे दोन्ही अटी समान ठरत असल्यास उमेदवाराच्या बाबतीत. सदर पदाकरीता आवश्यक असलेल्या किमान शैक्षणिक अर्हतेमध्येउच्चतर गुण प्राप्त उमेदवारास प्राधान्यक्रम देण्यात येईल. | |
| 5) | सर्वसाधारण सुचना | सर्वसाधारण अटी व शर्ती | शेरा |
| | | अ) उमेदवार भारताचा नागरीक असावा | |
| | | ब) उमेदवार हा महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा | डोमीसाईल प्रमाणपत्र आवश्यक |
| | | क) महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग शासन परिपत्रक क्रं. मकसी 1007/ | सदर उमेदवारांनी 865 गावांतील 15 वर्षाचे वास्तव्य असलेल्या रहिवाशी असल्याचा |

| | | | |
|---|---|---|---|
| | | प्र.क्र. 36/ का. 36 दिनांक 10 जुलै 2008 अन्वये महाराष्ट्र कर्नाटक सिमा भागातील महाराष्ट्र शासनाने दावा सांगीतलेल्या 865 गांवातील मराठी भाषिक उमेदवारांना वरील पदासाठी अर्ज करता येईल. | सक्षम प्राधिकाऱ्याचा विहित नमुण्यातील दाखला सादर करणे अनिवार्य राहिल. |
| 6) | वयोमर्यादा | I) उमेदवाराची विहित वयोमर्यादा **अर्ज करण्याचा अंतिम दिनांक - दि.** 06/01/2020 रोजीचे वय विचारात घेऊन गणले जाईल.<br>II). अर्ज सादर करण्याचे अंतिम दिनांकास उमेदवाराचे वय 18 पेक्षा कमी नसावे.<br>III)अर्ज सादर करण्याचा अंतिम दिनांक 06/01/2020 रोजी उमेदवारांचे वय 43 वर्षे पेक्षा जास्त नसावे.<br>**या शिवाय विहित वयोमर्यादा इतर कोणत्याही बाबतीत शिथिल केली जाणार नाही.** | |
| 7) | **अर्ज भरण्याची कार्यपद्धतीआणि सुचना :-** | | |
| | 1) परिक्षेकरिता अर्ज उमेदवारानी स्वहस्ताक्षरांत भरलेला असावा अर्जाचा लिफाप्यावर ज्यापदाकरिता अर्ज केलेला आहे त्या पदाचे नाव ठळक अक्षरात नमुद करावे. जाहिरात प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासुन ते दिनांक 06.01.2020 पर्यं सायंकाळी 05:30 वाजे पर्यंत अर्ज पोस्टाद्वारे किंवा प्रत्यक्ष स्विकारण्यात येतील. तदनंतर पोष्टाद्वारे किंवा प्रत्यक्ष अर्जाचा विचार केला जाणार नाही. यांची नोंद घ्यावी. | | |
| | 2) उमेदवाराचे नाव, वडीलांचे, पतीचे नाव, आडनाव, वडिलांचे नाव, आईचे नाव, जन्मदिनांक, भ्रमणध्वनी क्रमांक, ई-मेल, छायाचित्र, स्वाक्षरी ही मुलभूत माहिती आहे जी उमेदवाराला सविस्तर द्यावी लागेल. उमेदवाराने अली कडील छायाचित्र (फोटोग्राफ) आवश्यक आहे. | | |
| | 3) पत्ता टाकण्यासाठी उमेदवाराने आपल्या पत्त्याचा प्रकार निश्चित करावा. उदा. कायमस्वरुपी पत्ता, तात्पुरता पत्ता किंवा दोन्ही आणि त्यानुसार आपले गाव, पोस्ट ऑफिस, राज्य, जिल्हा, पिन कोड इ. सहित माहिती भरावी. | | |
| | 4) उमेदवाराने आवेदन अर्ज करण्यापूर्वी संपूर्ण जाहिरात सविस्तरपणे वाचणे अपेक्षित आहे. आवेदनअर्ज भरण्यापुर्वी उमेदवाराने विस्तृत जाहिरातींचे काळजीपूर्वक वाचन करावे जाहिरातीतील सूचना पूर्णपणे वाचूनच अर्ज भरण्याची दक्षता उमेदवारांनी स्वतः घ्यावी. | | |
| | 5) तसेच मराठी भाषेतील प्राविण्य, MS-CIT प्रमाणपत्र, आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांचे पाल्य, अपंगत्वाचा प्रकार (लागू असल्यास) या संबंधीची माहिती द्यावी लागेल. | | |
| | 6) शैक्षणिक माहितीच्या जागी उमेदवाराने आपली सविस्तर शैक्षणिक माहिती भरावी. शैक्षणिक पात्रते मध्ये जाहिरातीमध्ये नमूद केल्या प्रमाणे माहिती देणे अनिवार्य आहे. तसेच पदाच्या अर्हतेनुसार आवश्यक ती शैक्षणिक माहिती देणे आवश्यक आहे. तरच आपणास त्यापदासाठी अर्ज करता येईल. | | |

| 8) | महत्वाच्या सूचना : |
|---|---|
| 1) | उमेदवाराने एका पदासाठी फक्त एकदाच अर्ज करावा.<br>उमेदवाराने भरणा केलेले परीक्षा शुल्क कोणत्याही परिस्थिती मध्ये (अनेकदा अर्ज करणे, अर्ज चुकणे, काही कारणास्तव परीक्षेस बसू न शकणे, इत्यादी अशा कारणांसाठी) परत केले जाणार नाही. |
| 2) | उमेदवारास विभागीय परीक्षा तसेच हिंदी व मराठी परीक्षा तत्संबंधी नियमानुसार परीक्षा त्याला/तिला परीक्षा उत्तीर्ण होणे (शासन निर्णयानुसार लागु असल्यास) अनिवार्य असेल. |
| 3) | उमेदवारांना लेखी/व्यावसायिक परिक्षेस तसेच मूळ कागदपत्रांच्या छाननीसाठी स्वखर्चाने उपस्थित रहावे लागेल. उपस्थित राहिल्याबाबत त्यांना कोणत्याही प्रकारचे प्रवास भाडे अथवा भत्ता देय राहणार नाही. |
| 4) | निवडी संबंधात कोणत्याही प्रकारचा दबाव आणल्यास किंवा प्रलोभन दाखविल्यास संबंधित उमेदवारास अपात्र ठरविण्यात येईल. |
| 5) | उमेदवारांची जिल्हा परिषद सेवेसाठी निवड होवून नियुक्ती मिळाल्यास त्यांना शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या सेवाप्रवेशोत्तर परीक्षा, विभागीय परीक्षा आणि इतर परीक्षा व प्रशिक्षण विहित संधीत व विहित कालावधीत उत्तीर्ण व्हावे लागेल. अन्यथा शासनाने वेळोवळी विहित केलेप्रमाणे सदरची नियुक्ती संपुष्टात आणणे इत्यादी कारवाई केली जाईल. |
| 6) | निवडप्रक्रिया सुरु झाल्यानंतर किंवा नियुक्तीनंतर कोणत्याही क्षणी उमेदवारांने अर्जात नमूद केलेली माहिती/अगर बनावट कागदपत्रे सादर केल्याचे/उमेदवाराने सादर केलेली माहिती वस्तुस्थितीदर्शक नसल्याचे किंवा खरी माहिती दडवून ठेवल्याचे केव्हाही निदर्शनास आल्यास केलेली निवड/नेमणूक रद्द केली जाईल. |
| 7) | फक्त याच जाहिरातीला अनुसरुन ज्या उमेदवारांचे अर्ज ऑफलाईन पध्दतीने शिक्षण विभाग प्राथमिक जिल्हा परिषद गोंदिया कार्यालयास प्राप्त होतील केवळ अशाच उमेदवारांचे अर्ज विचारात घेतले जातील. अन्य कोणत्याही संदर्भातील यापूर्वी या कार्यालयास प्राप्त झालेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत याची कृपया नोंद घ्यावी. |
| 8) | अर्ज केला अथवा विहित अर्हता धारण केली म्हणजे कागदपत्रांच्या छाननी करिता बोलावण्याचा अथवा नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला असे नाही. |
| 9) | मूळ कागदपत्रांची छाननी अंती व आक्षेप/हरकतींचा विचार करुन अंतिम निवड यादी प्रसिध्द करण्यात येईल. |
| 10) | अर्ज करताना उमेदवारांना सर्व आवश्यक कागदपत्रे सादर करणे बंधनकारका आहे. ज्या उमेदवारांकडे पदाकरीता आवश्यक शैक्षणिक व इतर पात्रता नसेल अशा उमेदवारांनी अर्ज करु नयेत. |

| | |
|---|---|
| 9) | **विशेष सुचना** |
| | 1) महाराष्ट्र शासन वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक अनिया/1005/126 सेवा-4 दिनांक 31 ऑक्टोबर 2005 नुसार दि. 01 नोव्हेंबर, 2005 रोजी किंवा त्यानंतर ज्यांची शासकीय सेवेत नियुक्ती होईल त्यांना नविन परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजना समाप्त करुन शासनाने नव्याने दिनांक 01.04.2015 पासून लागू केलेली राष्ट्रीय निवृत्ती वेतन योजना लागू राहील. मात्र सद्या अस्तित्वात असलेल्या निवृत्ती वेतन योजना म्हणजे महाराष्ट्र नागरी सेवा ( निवृत्ती वेतन) नियम 1982 व महाराष्ट्र नागरी सेवा ( निवृत्ती वेतनाचे अंशराशीकरण) नियम 1974 आणि सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी योजना त्यांना लागू होणार नाही. |
| | 2) निवड झालेल्या उमेदवारांना प्रशासकिय सोय विचारात घेऊन उपलब्ध असलेल्या रिक्त पदी प्रथम पदस्थापना देण्यात येईल. उमेदवारांनी पदस्थापनेबाबत कोणत्याही प्रकारे सक्षम प्राधिकाऱ्यांवर दबाव आणल्यास त्यांचे नाव निवड यादीतून कमी करण्यात येईल. |
| | 3) मुलाखती संबंधि सुचना या केवळ संकेत स्थळावरूनच उपलब्ध करण्यात येणार असल्याने उमेदवारांनी सदर संकेतस्थळाला भरती प्रक्रिये दरम्यान वेळोवेळी भेट देवून भरती प्रक्रियेची माहिती कार्यक्रमाबाबत अद्यावत राहण्याची जबाबदारी संबंधित उमेदवाराची राहील. |
| | 4) सदर पदभरतीचे नियम/निकषामध्ये पदभरती पुर्ण होईपर्यंत वेळोवेळी निर्गमीत होणाऱ्या शासन निर्णय/परीपत्रक/अधिसुचना यानुसार बदल होवू शकतो. |
| 10) | **इतर सर्वसाधारण सुचना** |
| | 1) ज्या उमेदवारांनी यापुर्वी जरी त्यांचे नाव रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्राकडे, सेवा योजन कार्यालय, समाजकल्याण, आदिवासी विकास प्रकल्प अधिकारी तसेच जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी कार्यालयात नांवे नोंदविली असली तरी अशा उमेदवारांना विहीत मुदतीत स्वतंत्ररित्या अर्ज करणे व परिक्षा शुल्क भरणे आवश्यक राहील (माजी सैनिकांना परीक्षा शुल्क भरणे आवश्यक नाही) तसेच प्रकल्पग्रस्त, अंशकालीन अशा इच्छुक व पात्र उमेदवारांनी देखील अर्ज सादर करणे आवश्यक आहे. अशा उमेदवारांना कार्यालयामार्फत स्वतंत्रपणे कळविले जाणार नाही. |
| | 2) अनुभवाच्या बाबतीत मासिक, नियतकालीक, अंशकालीक, विद्यावेतन, अंशदानात्मक, विनावेतन तत्वावर केलेला अंशकालीन सेवेचा कालावधीत सेवेत प्रभारी म्हणून नेमणूकीचा कालावधी, अतिरिक्त कार्यभाराचा कालावधी अनुभवासाठी ग्राह्य धरता येणार नाही. |
| | 3) सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्र. बिसीसी 2018/प्र.क्र.308/2019/16-ब दिनांक 21 डिसेंबर, 2019 नुसार अनुसूचित जमातीचे जात वैधता प्रमाणपत्र धारक उमेदवारांनीच भरतीकरीता अर्ज करावे. जात वैधता प्रमाणपत्र अर्जा सोबत संलग्न नसल्यास अपात्र करण्यात येईल. |
| | 4) शासकीय /निमशासकीय कर्मचाऱ्यांनी त्यांचे अर्ज त्यांच्या संबंधित नियुक्ती प्राधिकरणाच्या परवानगीने भरावयाचा आहे. अशी परवानगी प्राप्त केल्याची प्रत कागदपत्र पडताळणीच्या वेळी उमेदवाराकडे असणे आवश्यक आहे. कागदपत्र प्रत उपलब्ध करुन न देल्यास अपात्र करण्यात येईल. |
| | 5) आवेदन अर्ज केला अथवा विहित अर्हता धारण केली म्हणजे पात्रता परिक्षेस बसण्याचा/कागदपत्र पडताळणीस बोलविण्याचा अथवा नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला असे नाही. निवडीच्या कोणत्याही |

| | |
|---|---|
| | टप्प्यावर अर्जदार विहित अर्हता धारण न करणारा आढळल्यास किंवा खोटी माहिती पुरविल्यास अथवा एखादया अर्जदाराने त्याच्या निवडीसाठी निवड समितीवर प्रत्यक्ष/अप्रत्यक्षरित्या दबाव आणला अथवा गैरप्रकाराचा अवलंब केल्यास त्यास निवड प्रक्रियेतुन बाद करण्यात येईल. |
| | 6) निवड प्रक्रिया सुरू झाल्या नंतर किंवा नियुक्ती नंतर कोणत्याही क्षणी उमेदवारानी दिलेली माहिती अगर कागदपत्रे खोटी सादर केल्याचे किंवा खरी माहिती दडवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास त्या उमेदवाराची उमेदवारी/नियुक्ती बाद करण्यात येईल. व शासनाची दिशाभुल केल्या प्रकरणी सदर उमेदवारा विरूध्द योग्य ती कार्यवाही करण्यात येईल. |
| | 7) चारित्र्य-पुर्वचारित्र्य पडताळणी अंती अक्षेपार्ह बाबी आढळून असल्यास संबंधित उमेदवार नियुक्तीसाठी/सेवेसाठी पात्र राहाणार नाही. तसेच कोणत्याही टप्प्यावर असे उमेदवार अपात्र ठरतील. |
| | 8) निवड झालेल्या उमेदवारांनी आवश्यक त्या सर्व प्रमाणपत्र/हमीपत्र इत्यादींची पुर्तता करून देणे आवश्यक राहील. तसेच त्या प्रमाणपत्रांची पडताळणी विहित पध्दतीनुसार करून घेणे बंधनकारक राहील. सेवेत नियुक्त होणाऱ्या उमेदवारांना नियमानुसार आवश्यक ती सेवाप्रवेशोत्तर परीक्षा/प्रशिक्षण विहित मुदतीत उत्तीर्ण/पुर्ण करणे आवश्यक राहील. |
| | 9) कागदपत्र पडताळणीस उमेदवारास स्वखर्चाने उपस्थित रहावे लागेल. |
| | 10) निवड झालेल्या उमेदवारांची वैद्यकीय तपासणी करण्यात येईल. वैद्यकीय अहवाल प्रतिकुल असल्यास केलेली निवड व नेमणुक रद्य करण्यात येईल. |
| | 11) वरील अटी व शर्ती नियमाव्यतिरिक्त शासनाने वेळोवेळो निर्गमित केलेले आदेश व निर्णय लागू राहील. |
| | 12) जाहिराती मधील काही मुद्ये शासन निणर्याच्या विसंगत असल्यास शासन निर्णय अंतिम राहील. |
| | 13) शासन सामान्य प्रशासन विभाग पुरकपत्र क्र. प्रानिमं-2017/(प्र.क्र. 92/17)/13-अ. दिनांक 5.10.2015 मधिल तरतुदी नुसार लेखी परीक्षमध्ये समान गुण मिळालेल्या उमेदवारांचा गुणवत्ता यादीत समावेश करतांना आत्महत्याग्रस्त शेतक-यांच्या पाल्यास प्रथम प्राधान्य देण्याचा शासनाच्या धोरणानुसार अशा उमेदवारांकडे अर्ज करतेवेळी संबंधित जिल्हास्तरीय समितीने त्यास कुटूंबातील मृत शेतक-याचा पाल्य म्हणुन पात्र ठरविण्या बाबतचा पुरावा सांक्षाकित प्रतिसह कागदपत्र छाननीच्या वेळी पडताळणी समितीस उमेदवाराने उपलब्ध करुन देणे आवश्यक राहील. |

# अर्जाचा नमुना

प्रति,

मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, गोंदिया.

1. ज्या पदासाठी अर्ज करावयाचे आहे त्या पदाचे नांव :- -------------------------------------------

2.अर्जदाराचे पुर्ण नांव व पत्ता :- --------------------------------------------

3. अर्जदाराचे वडीलाचे नांव / पतीचे नांव :- --------------------------------------------

4. पत्र व्यवहाराचा पुर्ण पत्ता :- --------------------------------------------

5 .राष्ट्रीयत्व :- -------------------------------------------

6 .महाराष्ट्र राज्याचा अधिवासी आहे काय ? :-------------------------------------------

(डोमिसाईल प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक)

7. ज्या प्रवर्गात अर्ज करावयाचे आहे त्या प्रवर्गाचे नांव :- -------------------------------------------

8.जात व प्रवर्ग (मागासवर्गीय असल्यास
जातीवैधता प्रमाणपत्र जोडणे आवश्यक ) :- -------------------------------------

9.अर्जदार पुरुष आहे की स्त्री :- -------------------------------------

10.अर्जदार माजी सैनिक :- -------------------------------------

माजीसैनिक असल्याचे प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक)

11. अर्जदाराची जन्मतारीख :- -------------------------------------

( दिनांक 06.01.2020 रोजी वय ) वर्ष महिना दिवस

12. धनाकर्ष क्रमांक व रक्कम, दिनांक व बँकेचे नांव :- -------------------------------------

13. विवाहित /अविवाहित

विवाहीत असल्यास अपत्यांची संख्या :-------------------------------------

व शेवटच्या अपत्याची जन्म तारीख :- -------------------------------------

14 .शैक्षणिक पात्रता

| अ.क्रं. | शैक्षणिक पात्रता (अभ्यासक्रमाचे नांव) | उतीर्ण झाल्याचे वर्ष | एकुण गुण | प्राप्त गुण | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | | 3 | 4 | 5 |
| | | | | | |

15 .व्यावसायीक पात्रता

| अ.क्रं. | व्यावसायीक पात्रता (अभ्यासक्रमाचे नांव) | उतीर्ण झाल्याचे वर्ष | एकुण गुण | प्राप्त गुण | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | | 3 | 4 | 5 |
| | | | | | |
| | | | | | |

16. TET/ TAIT (असल्यास प्रमाणपत्र जोडावे )

| अ. क्रं. | TET/ TAIT चा बैठक क्रमांक | एकूण गुण | प्राप्त गुण | प्राप्त टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 |
| | | | | |

## प्रतिज्ञा पत्र

मी असे प्रमाणित करतो/ करते की, आपले कार्यालयाकरीता --------------------------------- ची पदे भरणेसंबधी जाहीरात मी काळजीपुर्वक वाचली असुन सदर जाहीरातीतील अटी व शर्ती मान्य आहेत. तसेच वरील अर्जात दिलेली माहीती खरी असुन त्याचे पृष्ठयर्थ मी प्रमाणपत्राच्या सांक्षांकित सत्यप्रती सोबत जोडल्या आहेत .वर नमुद केलेली माहीती खोटी अगर चुकीची आढळुन आल्यास माझी या पदाकरीता उमेदवारी रद्द होईल व मी कायदेशीर कार्यवाहीस पात्र राहीन. याची मला जाणीव आहे.याबद्‌ल माझी कोणतीही तक्रार राहणार नाही.

**दिनांक** :-

**ठिकाण** :-

**अर्जदाराची स्वाक्षरी**

अर्जासोबत खालीलप्रमाणे आवश्यक कागदपत्राच्या सांक्षाकित प्रती जोडण्यांत याव्या.

1) शाळा सोडल्याचा दाखला (प्रमाणपत्र) (जन्मतारखेच्या दाखल्यासाठी) 2) माध्यमिक परिक्षा, पदवी व पदव्युत्तर पदवी चे गुणपत्रीका व विद्यापिठाची पदवी व त्यानंतर उतीर्ण केलेले परिक्षेचे गुणपत्रक 3) D.ed किंवा DT.Ed. / B.Ed. गुणपत्रीका 4) TET व TAIT चे प्रमाणपत्र 5) अधिवासाचा दाखला 6) मागासवर्गीय उमेदवारासाठी जातीचे प्रमाणपत्र 7) जाती वैधता प्रमाणपत्र 8) प्रकल्प ग्रस्त उमेदवारासाठी पुर्नवसन अधिकारी यांचे प्रमाणपत्र 9) माजी सैनिकांकरीता जिल्हा सैनिक कार्यालयाचे प्रमाणपत्र 10) अंशकालीन उमेदवारांसाठी अंशकालीन काम केले असल्याचे शासनाने विहित केलेल्या दिनांकापुर्वीचे प्रमाणपत्र.संगणक प्रमाणपत्र व इतर आवश्यक कागदपत्रे

**महाराष्ट नागरी सेवा (लहान कुटंूबाचे प्रतिज्ञापन) नियम 2005 मधील प्रतिज्ञापत्राचा**
**नमुना - अ प्रतिज्ञापत्र**
**नमुना - अ**
**(नियम 4 पहा)**

मी, श्री/श्रीमती/कुमारी --------------------------------------- श्री --------------------------यांचा /यांची मुलगा/मुलगी/पत्नी, वय ------------------------वर्षे राहणार ----------------------------- याद्वारे पुढीलप्रमाणे असे जाहीर करतो/करते की,

1) मी ---------------------- या पदासाठी माझा अर्ज दाखल केलेला आहे.

2) आज रोजी मला --------------------(संख्या ) इतकी मुले आहेत त्यापैकी दिनांक 28 मार्च 2005 यानंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या ------------- आहे (असल्यास,जन्मदिनांक नमुद करावा.)

3) हयात असलेल्या मुलांची संख्या दोनपेक्षा अधिक असेल तर दिनांक 28 मार्च 2005 वा तद्नंतर जन्माला आलेल्या, मुलामुळे या पदासाठी मी अनर्ह ठरविण्यांस पात्र होईल याची मला जाणीव आहे.

**ठिकाण :- ---------------**

**दिनांक :- ----------------** **अर्जदाराची सही.**